128

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन

## पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य

## महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र. पोमसं /३६/ र. व का.(८३००) शा.नि.-अधिसूचना /०१/२०२३, मुंबई, दिनांक ३०/०८/२०२३

**संदर्भ :-** महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्र.पीईक्यू- ०२२२ / प्र.क्र.३७४ / पोल-४, दिनांक २९ ऑगस्ट, २०२३.

**विषय :-** राज्य पोलीस दलातील सन २०१९-२० या वित्तीय वर्षात निर्लेखित झालेल्या ८५७ वाहनांच्या बदली ५५४ नवीन वाहने खरेदी करण्यास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.

******

**परिपत्रक -**

महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्र. पीईक्यू- ०२२२ / प्र.क्र.३७४ / पोल-४, दिनांक २९ ऑगस्ट, २०२३. अन्वये वित्त विभागाने दिलेल्या अभिप्रायाची प्रत यासोबत आवश्यक त्या कार्यवाहीसाठी संलग्न केली आहे.

२. तरी, सदर पत्रानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

( प्रविण शिखरे )
पोलीस महासंचालक यांचे उप सहायक(र.व.का.),
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,

अपर पोलीस महासंचालक, (प्रशासन), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
कार्यासन अधिकारी, का.क्र. १९-अ

प्रत,

पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय / परिपत्रके "वित्त विभाग" या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.



Scanned with CamScanner

**राज्य पोलीस दलातील २०१९-२० या वित्तीय वर्षात निर्लेखित केलेल्या ८५७ वाहनांच्या बदली ५५४ नवीन वाहने खरेदी करण्यास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग**
**शासन निर्णय क्रमांक पीईक्यू-०२२२/प्र.क्र.३७४/पोल-४,**
**गृह विभाग,मंत्रालय मुंबई- ४०० ०३२,**
**दिनांक :- २९ ऑगस्ट,२०२३.**

**संदर्भ:-** १) अपर पोलीस महासंचालक (प्रशासन), महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, मुंबई यांचे पत्र क्र. पोमसं/१९/३२-वाहने/सन २०१९-२०/निर्लेखित वाहनांच्या बदली नवीन वाहने खरेदीस मंजूरी/ ०४/२०२१,दि.२३.०६.२०२३

**शासन निर्णय:-** पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्या अधिनस्त सन २०१९-२० या वित्तीय वर्षातील राज्य पोलीस दलातील ८५७ वाहने निर्लेखित करण्यात आलेली आहेत. सदर निर्लेखित ८५७ वाहनांच्या बदली नविन ५५४ वाहने खरेदी करण्यासाठी रु.३८,६३,००,०००/- (अक्षरी रुपये अडोतीस कोटी त्रेसष्ट लाख फक्त) इतक्या रकमेस खालील तपशिलात नमूद केल्यानुसार प्रशासकिय मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | वाहनांचा प्रकार | वाहन संख्या | प्रति नग किंमत रु. | एकूण अंदाजित रु. |
|---|---|---|---|---|
| १ | कार | ०४ | ९,००,०००/- | ३६,००,०००/- |
| २ | पिक अप व्हॅन (डयुएल कॅबिन)/लाईट व्हॅन एमयुव्ही | १०३ | २५,००,०००/- | २७,७५,००,०००/- |
| ३ | ट्रक | ०४ | ३०,००,०००/- | १,२०,००,०००/- |
| ४ | वॉटर टँकर | ०४ | ३०,००,०००/- | १,२०,००,०००/- |
| ५ | बस/पर्सनल कॅरिअर | ११ | ३०,००,०००/- | ३,३०,००,०००/- |
| ६ | मोटार सायकल | ४२७ | १,००,०००/- | ४,२७,००,०००/- |
| ७ | कमांड पोस्ट व्हॅन | १ | ५५,००,०००/- | ५५,००,०००/- |
| | | | **एकूण** | **३८,६३,००,०००/-** |

२. सदर प्रशासकीय मान्यता खालील अटींच्या अधीन राहील.

१) वित्त विभाग, शासन निर्णय दि.२८.०७.२०२० नुसार पोलीस महानिरीक्षक दर्जाच्या अधिकाऱ्यांना रुपये १०.०० लक्ष किंमतीचे वाहन अनुज्ञेय आहे. पोलीस अधीक्षक व त्यावरील अधिकारी यांच्याकरीता रुपये ९.०० लक्ष मर्यादेतील वाहन अनुज्ञेय आहे. तरी या संवर्गातील अधिकाऱ्यांना त्यांना अनुज्ञेय असलेल्या किंमतीतील वाहने खरेदी करण्यात यावीत.

२) वाहनांची खरेदी मंजूर अनुदानातून व खरेदी नियमांच्या विहित कार्यपध्दतीचे पालन करुन करावी.

३) वित्त विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात आलेल्या या विभागाच्या दि.०५.१२.२०१७ च्या शासन निर्णयातील वाहन अनुज्ञेयतेनुसारच विभागाने खरेदी करावी.



Scanned with CamScanner

४) सदरची खरेदी ही अर्थसंकल्पिय वितरण प्रणालीवर उपलब्ध निधीच्या मर्यादेतच करण्यात यावी.

५) सदर निर्लेखित वाहनांबदली यापूर्वी नवीन वाहनांची खरेदी करण्यात आलेली नाही याची खात्री करण्याची तसेच कोणत्याही परिस्थितीत अनुज्ञेय वाहनांपेक्षा वाहनांची संख्या अधिक होणार नाही. याबाबतची दक्षता घेण्याची सर्वस्वी जबाबदारी विभागाची राहील.

३. प्रस्तुत प्रकरणी कार्यालय अधिक्षक,पोलीस महासंचालक,महाराष्ट्र राज्य,मुंबई कार्यालय यांना आहरण व संवितरण अधिकारी व नियंत्रण अधिकारी म्हणून अपर पोलीस महासंचालक (प्रशासन),महाराष्ट्र राज्य,मुंबई यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

४. याबाबतचा खर्च "मागणी क्रमांक बी-१ २०५५-पोलीस (००) १०९, जिल्हा पोलीस (००) (०१) जिल्हा पोलीस दल (२०५५ ०१६८), ५१-मोटार वाहने" या लेखाशिर्षाखाली सन २०२३-२४ च्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

५. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने त्यांच्या अनौपचारीक संदर्भ क्र.३४२/व्यय-७/२०२३, आणि अनौपचारीक संदर्भ क्र.२४८/२०२३/विनियम, दि.१०.०८.२०२३ अन्वये दिलेल्या मान्यतेस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

**(सुधाकर यादव)**
**अवर सचिव,महाराष्ट्र शासन.**

**प्रति,**

पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
अपर पोलीस महासंचालक (प्रशासन), महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालयमुंबई.
महालेखापाल-१(लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा), महाराष्ट्र , मुंबई.
अवर सचिव,वित्त विभाग (विनियम/व्यय), मंत्रालय, मुंबई.
अधिदान व लेखा अधिकारी/निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
निवडनस्ती/गृह विभाग (पोल-४).

Scanned with CamScanner